# सीएसएमटी-मेट्रो स्थानक भुयाराने जोडणार

## संयुक्त खर्च ; रेल्वेसह राज्य सरकारचा पुढाकार

मुंबई, ता. १२ : आझाद मैदान मेट्रो स्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून प्रवाशांना ये-जा करण्यासाठी भुयारी मार्ग उभारण्याचा निर्णय रेल्वे आणि राज्य सरकारने घेतला आहे. हा भुयारी मार्ग तब्बल ३५० मीटर लांबीचा आणि १८ मीटर रुंदी असणार आहे.

मेट्रो-३ रेल्वे मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पहिला टप्पा आरे ते बीकेसी उत्तर असून तो डिसेंबर २०२३ला सुरू होणार आहे, तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड असेल. डिसेंबर २०२४ मध्ये सुरू होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातच सीएसएमटी मेट्रो स्थानक आहे. हे आझाद मैदानातून भुयारी मार्गाने थेट सीएसएमटी स्थानकांवर पोहोचता येणार आहे. त्यासाठी सीएसएमटीपासून हिमालय पूल आणि पुढे आझाद मैदान असा तब्बल ३५० मीटर लांबीचा आणि १८ मीटर रुंदीचा भुयारी मार्ग उभारण्याची योजना रेल्वे आणि राज्य सरकारने आखली आहे. या भुयारी मार्गाचे काम लवकरच सुरू होणार आहे. त्यामुळे येथील हजारो प्रवाशांना सीएसएमटी स्थानकात आणि मेट्रो स्थानकात लगेच पोहोचता येणार आहे. याचा खर्च रेल्वे आणि राज्य सरकार संयुक्तपणे करणार आहे.

### ...असा असेल मार्ग

- भुयारी मार्ग सीएसएमटीच्या फलाट क्रमांक एकपासून सुरू होऊन हिमालय पूल, जिल्हा कोर्ट, प्रेस क्लबच्या समोरून पुढे आझाद मैदानाच्या दिशेने जाणार आहे.
- या पुलाची लांबी ३५० मीटर असणार आहे. तर रुंदी १८ मीटर असणार आहे.
- भुयारी मार्गामध्ये हवा खेळती राहावी म्हणून ठिकठिकाणी डक्ट काढण्यात येणार आहेत तसेच उच्च क्षमतेचे एक्झॉस्ट फॅन लावण्याची योजना आहे.
- सध्या असलेल्या सीएसएमटी भुयारी मार्गही आझाद मैदानातील मेट्रो स्थानकापर्यंत वाढविण्यात येणार आहे.